# मुंबईच्या वेगवान प्रवासाची दिशा कोणती?

## ‘लोकसत्ता शहरभान’ उपक्रमात व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांचा मुंबईकरांशी संवाद; मेट्रो, सागरी किनारा मार्ग प्रकल्पाच्या सद्यःस्थितीचा आढावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या मेट्रो प्रकल्पातील सर्वात महत्त्वाकांक्षी अशा भुयारी मेट्रो ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मार्गिकेचे काम सध्या वेगात सुरू आहे. या मार्गिकेतील आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. शिवाय दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडीवर उतारा म्हणून सागरी किनारा मार्गही साकारत आहे. मुंबईतील दोन्ही महत्त्वाकांक्षी प्रकल्प ज्यांच्या नेतृत्वाखाली आकार घेत आहेत त्या प्रशासकीय अधिकारी अश्विनी भिडे या ‘लोकसत्ता शहरभान’ उपक्रमाच्या येत्या पर्वात नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

पवईतील आयआयटी मुख्य प्रवेशद्वारासमोरील पवई बँक्वेट हॉल येथे बुधवारी, ८ नोव्हेंबरला सायंकाळी ६.१५ वाजता ह्ळलोकसत्ता शहरभानह्ळ होणार आहे. जागतिक दर्जाचे शहर म्हणून ओळख असलेल्या मुंबईत वाहतूक कोंडीची समस्या गंभीर आहे. ती सोडविण्यासाठी आणि मुंबईत अत्याधुनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प राबविण्यात येत आहेत.




**मुख्य प्रायोजक**
- सारस्वत को-ऑप. बँक लि.

**सहप्रायोजक**
- वीणा वर्ल्ड
- हिरानंदानी ग्रुप



**काय?** लोकसत्ता शहरभान.

**कधी?** ८ नोव्हेंबर, सायंकाळी ६.१५ वाजता

**कुठे?** पवई बँक्वेट हॉल, आयआयटी मुख्य प्रवेशद्वारासमोर, पवई.

त्यातील सागरी किनारा आणि मेट्रो ३ हे अत्यंत महत्त्वाचे प्रकल्प मानले जातात. एमएमआरडीएच्या ३३७ किमीच्या प्रकल्पातील ३३.५ किमीच्या मेट्रो ३ भुयारी मार्गाची बांधणी, संचालनाची जबाबदारी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनवर (एमएमआरसी) आहे. सागरी किनारा मार्गाचे बांधकाम मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून केले जाते. अशावेळी एमएमआरसीच्या सर्वेसर्वा, व्यवस्थापकीय संचालिका म्हणून मेट्रो ३ प्रकल्प तर मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त म्हणून सागरी किनारा प्रकल्प अश्विनी भिडे यांच्या नेतृत्वाखाली मार्गी लागत आहेत. एमएमआरडीएच्या अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून काम करताना भिडे यांनी मुंबईतील पहिल्या, घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा मेट्रो १ मार्गिकेच्या उभारणीत मोठे आणि महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या या कामाचा अनुभव पाहता त्यांच्याकडे मेट्रो ३ ची जबाबदारी सोपविण्यात आली. मेट्रो ३ मार्गिकेत अनेक अडचणी उभ्या राहिल्या. मात्र त्यावर यशस्वीपणे मात करून त्यांनी मेट्रो ३ प्रकल्प पुढे नेला. मुंबईसारख्या शहरात भुयारी मेट्रो मार्गिका उभारणे तांत्रिकदृष्ट्या मोठे आव्हान होते. मात्र हे आव्हानही त्यांनी यशस्वीपणे पेलले. म्हणूनच आज या मार्गिकेचे काम वेगात सुरू असून यातील पहिला टप्पा लवकरच वाहतूक सेवेत दाखल होणार असून भुयारी मेट्रोतून प्रवास करण्याचे मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचे कामही वेगाने सुरू आहे. मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रोतून,